# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवजयंती निमित्त बुधवार दिनांक. 19 फेब्रुवारी, 2020 रोजी सकाळी 8.30 वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांचे शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण व ध्वजारोहण असा संयुक्त समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/135
दिनांक : 13 FEB 2020

प्र.संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

1. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांना आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
3. मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्यावेळी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गायनाची व्यवस्था करावी.
4. वाहन विभागप्रमुख यांनी मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक/कलाकार व वाद्ये आणण्यासाठी वाहनाची सोय करावी.
5. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रम यासाठी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
6. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठीकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयाची देखभाल पहावी.
7. आभियांत्रिकी विभाग यांनी उद्यान विभागाच्या मदतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
8. नोटीस बोर्डवर लावणेसाठी–1) मुलींचे वसतिगृह क्र. 1 व 2 2) मुलांचे वसतिगृह क्रं. 1, 2 3) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन 4) बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
9. उद्यान विभागप्रमुखांनी ध्वजारोहण परिसरातील बागेची ठाकठिकता पहावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास व लहान पुतळयास असे दोन पुष्पहार आणावेत. त्यापैकी मोठा पुष्पहार मोठया पुतळयास अर्पण करण्याची व्यवस्था करावी व लहान पुष्पहार ध्वजारोहण कार्यक्रमापूर्वी मा. कुलगुरू यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास अर्पण केला जाईल. याची नोंद घ्यावी.
10. श्री ए. जी. सावंत जमादार व श्री. बी. के. पुजारी, हवालदार यांनी आस्थापना विभागाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार चार शिपाई या विभागाच्या मदतीस देण्याचे आहेत. त्याची पूर्व सूचना दिनांक. 18 फेब्रुवारी, 2020 रोजी सर्व संबधीतांना त्यांनी द्यावी.
11. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहणप्रसंगी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**शिवजयंती बुधवार, दिनांक 19 फेब्रुवारी, 2020**
**ध्वजारोहण समारंभ कार्यक्रम पत्रिका**
**वेळ सकाळी 08.30 वाजता**

| कार्यक्रम | परेडसाठी परेड कमांडरने द्यावयाच्या ऑर्डस् |
|---|---|
| मा. कुलगुरूंचे आगमन | : परेड सावधान। |
| मा. कुलगुरूंचे हस्ते छ. शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण | |
| मा. कुलगुरूंचे हस्ते ध्वजारोहण होईल. (मा. कुलगुरू ध्वजस्तंभ चौथऱ्यावर थांबतील) | : परेड सलामी दों। |
| राष्ट्रगीत होईल. | : भारत माता की जय। (तीन वेळा पुकार) |
| महाराष्ट्रगीत होईल. (बहू असोत सुंदर संपन्न की महान ) | : छ. शिवाजी महाराजकी जय (तीन वेळा पुकार) परेड विश्राम। परेड सावधान देवून। (परेड कमांडर परेड विसर्जनाची आज्ञा मागतील.) |
| मा. कुलगुरू परेड विसर्जनास (होकार) आज्ञा देतील.। | : परेड विसर्जन । |